मार्केट वॉच

# राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या संचालकपदी जितेंद्र ठक्कर

## कन्स्ट्रक्शन स्किल डेव्हलपमेंट कौन्सिलवरही निवड

**नाशिक, ता. ११ :** येथील ठक्कर्स डेव्हलपर्स लि.चे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांना भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयांतर्गत कार्य करणाऱ्या राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर २०१५-१७ या आर्थिक वर्षासाठी संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

खास बांधकाम क्षेत्रासाठी स्थापन केलेल्या कन्स्ट्रक्शन स्किल डेव्हलपमेंट कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेत कार्य करण्यासाठी या क्षेत्रातून देशभरातून १५ संचालक निवडण्यात आले. ठक्कर यांना



जितेंद्र ठक्कर

त्यातील एक सन्माननीय संचालक म्हणून वेगळी नियुक्ती देण्यात आली आहे. देशातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये कौशल्यप्राप्त मनुष्यबळाची असलेली वाढती गरज भागविणे आणि येथील विविध कौशल्यांची मागणी आणि पुरवठा यातील सध्याची दरी कमी करणे या उद्देशाने राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ कार्य करीत आहे.

दोन्ही नेमणुकांसाठी श्री. ठक्कर यांचे नामांकन करण्याचा निर्णय 'क्रेडाई' या स्थावर मालमत्ता विकसकांच्या अखिल भारतीय संघटनेच्या नवीन पदाधिकाऱ्यांच्या नवी दिल्ली येथे झालेल्या सोहळ्यावेळी करण्यात आली.